ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वार्षिक वर्गणी : ६ रु.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख १ ऑगस्ट, १९६२ | अंक १५

## विविध माहिती

**तेल-विजेवर चालणारीं रेल्वे एंजिनें**—रुंद रुळावर चालणारीं, तेल-विजेवर चालणारी दोन रेल्वे एंजिनें मुंबई बंदरांत उतरून घेण्यांत आलीं. अमेरिकेकडून मिळणाऱ्या ४० रेल्वे एंजिनांपैकीं तीं आहेत. ही एंजिनें २,६०० अश्वशक्तीचीं असून मोठ्या उतारावर गति नियंत्रण करण्याची खास व्यवस्था त्यांत करण्यांत आली आहे. एंजिनें मध्य रेल्वेवर उपयोगांत आणण्यांत येणार आहेत. त्यांचा उपयोग मुख्यतः कोळशाच्या गाड्या ओढण्यासाठी करण्यांत येईल.

**शाळकरी मुलांना फराळ**—राजस्थानमधील ५ लाख शाळकरी मुलांना चालू शैक्षणिक वर्षांत मधल्या वेळचें खाणें मोफत पुरविण्यांत येणार आहे. मुलांचीं वयें ६ ते ११ वर्षांपर्यंतचीं असतील. अमेरिकेंतील 'केअर' ह्या संघटनेच्या सहकार्यानें राजस्थान सरकारनें हा उपक्रम हातीं घेतला आहे. राजस्थानांत ह्या वयाचीं १३·५ लाख शाळकरी मुलें असून त्यांची संख्या लवकरच १५ लाखांपर्यंत जाईल, असा अंदाज आहे.

**बोकॅरो कारखान्यासंबंधींचा अहवाल**—हिंदमधील पोलादाचा चौथा कारखाना बोकॅरो येथें काढण्यांत यावयाचा असून त्यासंबंधींचा तांत्रिक व आर्थिक अहवाल तयार करण्यासाठी तीन अमेरिकन तज्ज्ञांचें मंडळ भारतांत आलें होतें. संकल्पित कारखान्याची व्यापारी दृष्टीनें पाहणी करण्याचें कामहि मंडळ करणार आहे. अमेरिकन तंत्रज्ञांच्या मदतीला हिंदी तंत्रज्ञ देण्यांत आले आहेत.

**छोटा यंत्रचलित नांगर**—अनेक कामें करूं शकणारा एक छोटा यंत्रचलित नांगर भारतांत तयार करण्यांत येणार आहे. ह्या नांगराची शक्ति ५ ते ६ अश्वशक्ति असेल आणि त्याची किंमत रु. १,५०० च्या आसपास असेल. ६ हिंदी कारखानदारांना असे नांगर तयार करण्यासाठी कारखाने काढण्याचे परवाने देण्यांत आले आहेत. छोट्या शेतकऱ्यांना तो उपयोगी पडावा अशी सरकारची इच्छा आहे.

**चाळिसगांव तालुक्यांतील बंडिंगचें काम**—चाळिसगांव तालुक्यांतील ६५,००० एकर जमिनींत आतांपर्यंत बंडिंगचें काम करण्यांत आलें आहे. ह्या कामासाठी सुमारें २५ लाख रुपये खर्च आला. तीन वर्षांपूर्वी चाळिसगांव तालुक्यांत जमिनीची धूप थांबविण्याचें काम करण्यासाठी एक केंद्र स्थापन करण्यांत आलें होतें. ह्या तालुक्यांत सुमारें २ लाख एकर शेतजमीन असून, त्यापैकीं १,७५,००० एकर जमिनींत बंडिंग करण्याची जरूरी आहे.

**विमानांच्या आवाजाबद्दल नुकसानभरपाई**—जपानमध्यें अमेरिकेचे लष्करी विमानतळ असून त्यावरून विमानांची येजा नेहमींच चालू असते. अलीकडे जेटवर चालणाऱ्या विमानांची संख्या वाढू लागल्यानें विमानतळाजवळील शहरांत राहाणाऱ्या नागरिकांना कानठाळ्या बसविणारे आवाज सारखे ऐकावे लागतात. ह्या उपसर्गाबद्दल जपानच्या सरकारकडे नुकसानभरपाईची मागणी करण्यासाठी एक संघटना उभारण्यांत आली आहे.

**भारत-सं. अरब प्रजासत्ताक व्यापार**—भारताचे परराष्ट्रीय व्यापारमंत्री श्री. मनुभाई शहा व संयुक्त अरब प्रजासत्ताक राज्याचे अर्थमंत्री यांच्यांत उभयता देशांमधील व्यापाराबाबत नवा करार करण्यासंबंधीं प्राथमिक स्वरूपाचीं बोलणीं झालीं. भारत व प्रजासत्ताक ह्यांच्यांत सध्यां दरसाल १ कोटी पौंडांचा व्यापार होत असतो. व्यापारांत वाढ होण्यास अजून वाव आहे, असें मानण्यांत येत आहे.

**आंतरजातीय विवाहाला उत्तेजन**—आंतरजातीय विवाह केल्यामुळें आर्थिक आपत्तींत सांपडलेल्या लोकांना मदत देण्याची एक योजना केरळ सरकारनें आखली आहे. योजना सध्यां तरी प्रायोगिक स्वरूपाची आहे. स्पृश्यास्पृश्य विवाहांच्या बाबतींत आर्थिक अडचणी प्रामुख्यानें उद्‌भवतात असें आढळून आल्यानें, अशा प्रकारच्या विवाहांना उत्तेजन देण्यासाठी ही योजना अमलांत आणण्यांत येणार आहे.

**कराच्या सूचनेला विरोध**—गुजरात सरकारनें शहरांतील मालमत्तेवर कर बसविण्याचें ठरविलें आहे. परंतु सुरतच्या नगरपालिकेनें ह्या कराच्या आकारणीविरुद्ध ठराव केला आहे. गुजरात सरकारनें हा कर बसविणें म्हणजे नगरपालिकेच्या हक्कावर आक्रमण आहे, असें ठरावांत म्हटलें आहे. सुरत नगरपालिकेंत काँग्रेसपक्षाचें बहुमत असूनहि हा ठराव मंजूर करण्यांत आला आहे.

**इतिहासकाराचें निधन**—प्रख्यात ब्रिटिश इतिहासकार व ग्रंथकार प्रा. जॉर्ज ट्रिव्हेलन हे आपल्या वयाच्या ८६ व्या वर्षी निधन पावले. ब्रिटनमधील सहा शतकांचा सामाजिक इतिहास त्यांनीं लिहिला आहे. त्यांचा हाच ग्रंथ विशेष प्रसिद्ध असून तो १९४२ मध्यें अमेरिकेंत प्रकाशित करण्यांत आला. सदर ग्रंथाच्या ४,१०,००० प्रती ७ वर्षांत खपल्या.

**शास्त्राच्या शिक्षणासाठी मदत**—पदवीनंतरच्या शास्त्रीय संशोधनासाठी आणि माध्यमिक शाळांच्या पातळीवर शास्त्रीय विषयांचें शिक्षण देण्यासाठी रशियानें १·५ कोटी रुपयांची मदत देऊ केली आहे. मदत पुढील सहा वर्षे देण्यांत येणार असून, संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या तांत्रिक साह्य मंडळातर्फे ती देण्यांत येईल.

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सिमेंटचें उत्पादन

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सिमेंटच्या उत्पादनाचें लक्ष्य वाढवावें कीं नाहीं, हा प्रश्न सिमेंटच्या कारखान्यांची यंत्रसामग्री देशांत किती लवकर तयार होऊं शकेल ह्यावर अवलंबून आहे. उत्पादनाचें सध्यांचें लक्ष्य १·५ कोटी टनांचें आहे. प्रत्यक्ष उत्पादन मात्र १·३ कोटी टन होईल असा अंदाज आहे. पोलाद व अवजड कारखान्याच्या खात्याला उत्पादनाचें लक्ष्य १·८ कोटी टन ठेवावें असें वाटत आहे. ह्याचा अर्थ उत्पादन करणारी यंत्र-सामग्री बसविण्यास खातें उत्सुक आहे. परंतु सध्यां परदेशीय चलनाचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळें नियोजन समिति लक्ष्य वाढविण्यास अनुकूल नाहीं. लक्ष्य वाढवावयाचें झालें तर सुमारें २० कोटी रुपये किंमतीचें परदेशीय चलन लागणार आहे. त्यांपेक्षा सध्यां चालू असलेल्या सिमेंटच्या कारखान्यांचा विस्तार करण्यावर भर देण्यांत यावा, अशी सूचना नियोजन समितीनें केली आहे. त्यासाठी आधीं सिमेंटच्या यंत्रसामग्रीच्या कारखान्यांचा विस्तार करावा लागेल.

## सव्वातीन टक्के दराच्या १९६२ च्या कर्जरोख्यांची परतफेड

दरसाल दरशेंकडा सव्वातीन व्याजाच्या दराच्या १९६२ च्या कर्जरोख्यांपैकी उरलेली रक्कम १६ जुलै, १९६२ रोजीं परत करावयाची आहे. त्या दिवसानंतर सदर रकमेवर व्याज मिळणार नाहीं. १६ जुलै, १९६२ रोजीं पैसे देणें सुलभ व्हावें म्हणून हे कर्जरोखे वटविण्यासाठी वा व्याज घेण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, तिच्या शाखा किंवा तिच्या उपबँका यांच्या ज्या शाखेंत तसेंच पब्लिक हेड ऑफिस वा ट्रेझरींत नांव नोंदविलें असेल तेथेंच ९ जुलै १९६२ रोजीं वा त्यानंतर आपल्याकडील हे कर्जरोखे सादर करावेत. यासंबंधांतील अधिक माहिती त्यांच्या-कडून घ्यावी.

## रूरकेला येथील खताचा कारखाना

रूरकेला येथें काढण्यांत यावयाच्या खताच्या कारखान्याचे बरेच विभाग तयार झाले असून, कारखान्यांत नैट्रिक ॲसिडच्या उत्पादनाला लवकरच प्रारंभ होईल अशीं लक्षणें दिसत आहेत. फर्टिलायझर कॉर्पोरेशनतर्फे हा कारखाना उभारण्यांत येत आहे. कारखान्याचा नमुना आणि त्याची उभारणी कॉर्पोरेशनच्या एंजिनिअर्सनींच केली आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीची चांचणी घेण्याचें काम सध्यां चालू आहे.

## अमेरिकेपासून शिकण्याचा सल्ला

रशिआंतील शेतीव्यवसायांत माजलेल्या गैरव्यवस्थेबद्दल मॉस्को येथें एक परिषद भरविण्यांत आली होती. परिषदेंत रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं रशिआच्या शेतकऱ्यांना असा सल्ला दिला कीं, त्यांनीं जुन्या उत्पादनपद्धति व नोकरशाही वृत्ति ह्यांना फांटा देऊन अमेरिकेकडून शेतीव्यवसायाचे धडे घ्यावे. व्यवस्था-पकीय कुशलता भांडवलवाल्यांकडून शिकण्यास लेनिनची हरकत नव्हती; इतकेंच नव्हे तर न शिकण्याच्या वृत्तीचा लेनिननें धिक्कार केला होता, ह्याची आठवण त्यांनीं आपल्या भाषणांत करून दिली. अमेरिकेंतील कोंबडी पाळण्याच्या धंद्यांतील उत्पादन-पद्धतीची वाखाणणी करून ते म्हणाले कीं, रशिआंत ह्या पद्धति वापरण्यांत आल्या तर कोंबड्यांचें मांस स्वस्त होईल. सध्यां रशिआंत हें मांस बरेंच महाग आहे.

## युरोपमधील तेलाची बाजारपेठ

पश्चिम युरोप ही खनिज तेलाची एक फार मोठी बाजारपेठ आहे. ह्या बाजारपेठेवर आतांपर्यंत ब्रिटिश व अमेरिकन तेल कंपन्यांचें वर्चस्व होतें. परंतु आतां ह्या कंपन्यांना रशिअन व फ्रेंच तेलाशीं स्पर्धा करावी लागणार आहे. सहारा वाळवंटांतील तेल उपसून तें फ्रान्समध्यें आणण्यासाठीं नळ टाकण्याचें काम फ्रेंच कंपन्या जोरानें करीत आहेत. रशिआहि काळ्या समुद्राच्या भागांतील तेल पश्चिम युरोपमध्यें नेण्यासाठीं नळ घालीत आहे. खुद्द युरोपांत मोटारींची संख्या व मोटारींचे रस्ते अमेरिकेप्रमाणें मुबलक होत आहेत. उद्योगधंदे व घरगुती वापर ह्यांतहि तेल अधिक प्रमाणांत उपयोगांत येऊं लागलें आहे. त्यामुळें युरोप-मधील तेलाची बाजारपेठहि विस्तार पावत आहे.

## मध्यप्रदेशांत ॲल्युमिनमचा कारखाना

मध्यप्रदेशांत हंगेरीच्या सरकारच्या मदतीनें ॲल्युमिनम तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्या-मधून दरसाल ५०,००० टन ॲल्युमिनम बाहेर पडेल अशी अपेक्षा आहे. कारखान्यासंबंधींचा तपशील ठरविण्यासाठी भारत सरकारचे आंतरराष्ट्रीय व्यापारखात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा वाटाघाटी करणार आहेत. हंगेरी हा देश ॲल्युमिनमच्या प्रमुख उत्पादकांपैकी एक आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं हंगेरी-कडून ८ कोटी रुपयांचें भांडवलहि मिळणार आहे. कारखान्या-साठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी कांहीं यंत्रसामग्री भारतांतच बनविण्यांत येणार आहे. हंगेरीच्या मदतीनें शेणापासून गॅस तयार करणाऱ्या यंत्रांचे दोन कारखानेहि काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक कानपूर येथें व दुसरा दिल्ली येथें काढण्यांत येईल.

समृद्धीची मार्गप्रतीक्षा करीत असतांना तुमच्या दृष्टीसमोर

**दि बेळगांव बँक लि., बेळगांव**

**( रजिस्टर्ड आणि मुख्य कचेरी : बेळगांव )**

ही बँक अवश्य असू द्या.

उद्याच्या समृद्धीचें आजचें पाऊल, म्हणजे आमचेकडे खातें सुरू करणें.

| | | | |
|---|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | | द. सा. | ३% |
| मुदतीच्या ठेवी | १ वर्ष | किमान | ४% |
| | २ वर्षें | ,, | ४¼% |
| | ३ वर्षें | ,, | ४½% |
| | ४ वर्षें | ,, | ४¾% |
| | ५ वर्षें | ,, | ५% |

★ तीन वर्षांच्या कॅश सर्टिफिकेटांवर मुदत भरतेवेळीं ४½% व्याज सुटतें.

★ पांच वर्षांच्या कॅश सर्टिफिकेटांवर मुदत भरतेवेळीं ५% व्याज सुटतें.

★ कॉल व शॉर्ट डिपॉझिट्स आकर्षक व्याजाच्या दरानें स्वीकारलीं जातात.

**समक्ष येऊन आमचेकडे खातें उघडा**

अ. रा. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल्. बी. मॅनेजिंग डायरेक्टर

बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल्. बी. चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. १ ऑगस्ट, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरकारखान्यांपुढील प्रश्न

### महाराष्ट्रांतील धंद्याचें वैशिष्ट्य उरलें नाहीं.

साखरकारखान्यांची संख्या वाढत गेल्यामुळें साखरेचें उत्पादन आतां मागणीपेक्षा खूपच जास्त होऊं लागलें आहे आणि ह्या जादा साखरेच्या उठावाचा प्रश्न बिकट होत चालला आहे. उत्पादनांत भलती वाढ होऊं नये, म्हणून सरकारनें साखरेच्या मोसमाचे प्रारंभीं उत्पादनांत १०% कपात सक्तीची केली होती. तरी गेल्या मोसमांत सुमारें २७ लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें. वर्षाच्या प्रारंभीं ११·५ लक्ष टन साखर शिल्लक होती. म्हणजे, एकूण ३८·५ लक्ष टन साखर उपलब्ध झाली. अंतर्गत खप २४ लक्ष टनांच्या आसपास धरला, तर १४·५ लक्ष टन साखर उरते. साखरेच्या हिशेबाचे वर्षांत फार तर ३ टन साखर निर्गत झालेली असेल. म्हणजे वर्षारंभाइतका साठा पुन: शिल्लक राहीलच. म्हणून साखरेचा अंतर्गत खप वाढविण्यासाठीं मुद्दाम प्रयत्न करण्याची आवश्यकता आतां निर्माण झाली आहे. १९५७ सालीं साखरेवरील एक्साइज ड्यूटी दर मणास ४ रु. २ आ. ची १०·७० रु. करण्यांत आली, त्याचा उद्देश निर्गतीसाठीं साखर मिळावी म्हणून अंतर्गत खप कमी करावा, असा होता. आतां ह्या वाढत्या दराची आवश्यकता उरलेली नाहीं, असें डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. एफ. एडवर्डस् ह्यांनीं असोसिएशनच्या वार्षिक सभेंत दि. २३ जुलै रोजीं प्रतिपादन केलें.

साखर कारखान्यांनीं साखर निर्गत करण्यांत होणारा तोटा कमी करण्याच्या उद्देशानें निर्गत झालेल्या साखरेवरील ऊंसपट्टी परत करण्याचें सरकारनें मान्य केलें होतें. बाकीच्या बहुतेक सर्व राज्यसरकारांनीं त्याप्रमाणें रिफंड दिला. पण महाराष्ट्र सरकारनें मात्र अद्याप १९५८-५९, १९५९-६० आणि १९६०-६१ चा रिफंड अजून दिलेला नाहीं. "महाराष्ट्र सरकारच्या कारभाराला हा मोठाच कलंक आहे." असे उद्गार अध्यक्षांना आपल्या भाषणांत काढण्याची पाळी आली आहे.

महाराष्ट्र राज्यांतील साखर कारखान्यांची संख्या १९५५-५६ मध्यें १५ होती, ती १९६१-६२ मध्यें २७ होऊन साखरेचें उत्पादन १,९५,००० टनांचें ५ लक्ष टनांपर्यंत वाढलें आहे. महाराष्ट्र राज्य आतां साखरेच्या बाबतींत स्वावलंबी झालें आहे, इतकेंच नव्हे तर त्यांतील उत्पादन गरज भागवून उरेल एवढें आहे. त्याकारणानें, बाजारपेठेचें सान्निध्य आणि वाहतूकखर्चाची बचत, हें येथील कारखान्यांचें वैशिष्ट्य आतां उरलेलें नाहीं. सीलिंगच्या कायद्यामुळें साखर कारखान्यांना उत्तरेकडील कारखान्यांप्रमाणें सर्व ऊंस विकत घ्यावा लागणार आहे. म्हणून, महाराष्ट्रांतील साखर कारखान्यांतील कामगारांना सर्वांत जास्त वेतन सेंट्रल वेज बोर्डानें देवविलें आहे, तें आतां सयुक्तिक नाहीं, असेंहि श्री. एडवर्डस ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें.

## कंपनी कायद्याखाली देण्यांत आलेल्या शिक्षा

कंपनी कायद्यांतील कलमांचा भंग केल्याबद्दल देण्यांत आलेल्या शिक्षा असे गुन्हे पुन्हा न घडण्याच्या दृष्टीनें पुरेशा कठोर नाहींत, असें आढळून आलें आहे. गेल्या ६ वर्षांच्या कालांत कायद्याच्या अंमलबजावणी खात्यानें २०,६०० खटले भरले होते. त्यांपैकी १५,४०० खटल्यांतील संबंधितांवर गुन्हे शाबीत झाले. तथापि ह्या गुन्ह्यांबद्दल दिलेल्या दंडाच्या शिक्षांच्या पोटीं अवघी ११ लाख रुपयांची रक्कम जमा झाली. त्यांपैकी २·४३ लाख रुपयांची रक्कम सरकारला खटल्यांच्या खर्चासाठीं देण्यांत आली. ह्यावरून असें दिसतें कीं, कंपनी कायद्यांतील कलमांचा भंग केल्यास मोठाल्या दंडाची शिक्षा देण्याची तरतूद केलेली असतांनाहि गुन्हेगारांना अति सौम्य शिक्षा करण्यांत आल्या. दंडापोटीं वसूल करण्यांत आलेल्या रकमेवरून कंपन्यांकडून करण्यांत आलेल्या गुन्ह्यांचा गंभीरपणा नीटसा लक्षांत येत नाहीं. उदाहरणार्थ, कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा न बोलावण्याचा गुन्हा. ह्या गुन्ह्याबद्दल जास्तींतजास्त ५,००० रुपयांच्या दंडाची शिक्षा देतां येईल. परंतु कित्येक खटल्यांत कोर्टानें प्रत्येक गुन्हेगारास फक्त १ रुपया दंड केलेला आहे. रजिस्ट्रार ऑफ कंपनीज ह्यांच्याकडे प्रत्येक कंपनीनें आपला वार्षिक ताळेबंद आणि नफातोटापत्रक पाठवावयाचें असतें. योग्य मुदतींत हे कागदपत्र दाखल केले न गेल्यास दर दिवसामागें ५० रुपयांची शिक्षा देतां येते. परंतु ह्याहि बाबतींत रुपयाभर दंडावर भागविलें गेल्याचें आढळून येतें. जास्तींतजास्त दंड करण्याच्या बाबतींत थोडासा ढिलेपणा दिसून येत असला, तरी एकंदरींनें कंपन्यांच्या चालकांचा सुस्तपणा व आळशीपणा कमी करण्याच्या कामीं, कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीखात्याला बऱ्यापैकी यश आलें असल्याचा दावा करण्यांत येत आहे.

## परदेशीय मदत कमी झाल्यामुळें राजीनामा

इराणचे पंतप्रधान डॉ. अॅगी अमिनी यांनीं आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. अमेरिकेकडून मिळणारी मदत उशीरां येऊं लागली आणि लष्करी मदतींतहि अमेरिकेनें कपात केली, म्हणून त्यांना राजीनामा द्यावा लागल्याचें त्यांनीं स्वतःच जाहीर केलें आहे. इराणच्या सरकारचीं सूत्रें त्यांनीं १९६१ च्या मे महिन्यापासून हातीं घेतलीं. तेव्हांपासून इराणला अमेरिकेकडून फक्त तीन कोटी डॉलर्स मदत मिळाल्याचें त्यांनीं सांगितलें. मदत कमी झाल्यामुळें इराणचा आर्थिक व्यवहार चालविणें कठीण जाऊं लागलें आणि सरकारच्या अंदाजपत्रकांत २·५ कोटी पौंडांची तूट येऊं लागली. युद्धोत्तर काळांत मागासलेल्या देशांचा विकास करण्यासाठी पाश्चिमात्य देश मदत देऊं लागले. कित्येक लहानसहान देशांचीं सरकारें तर धनाढ्य पाश्चिमात्य देशांच्या मदतीवरच तग धरून राहिलीं. इराणच्या पंतप्रधानांचा राजीनामा सूचक असून मदत घेणाऱ्या देशांनीं स्वावलंबनाचें महत्त्व वेळींच ओळखण्याच्या गरजेचा तो इषारा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## युनायटेड नेशन्सची उपयुक्तता धोक्यांत
### खर्चाच्या वर्गणीचा प्रश्न

युनायटेड नेशन्सच्या सनदींचें कलम १७, परिच्छेद २, ह्या-अन्वयें काँगो आणि गाझा ह्यांतील कारवायांचा खर्च देण्यास युनायटेड नेशन्सचे सर्व सभासद बांधले गेले आहेत किंवा नाहीं ? हा महत्त्वाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयापुढें होता. यु. नेशन्सचा खर्च जनरल असेंब्ली ठरवून देईल त्या प्रमाणांत सभासदांनीं दिला पाहिजे असें ह्या कलमांत सांगितलेलें आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि शाश्वति ह्यांच्या संपादनासाठी युनायटेड नेशन्सला कर्ज उभारण्याचा कायदेशीर अधिकार आहे काय? जागतिक कोर्टानें ९ विरुद्ध ५ मतांनीं अस्तिपक्षी निर्णय दिला आहे, तरी ज्या कारवायांना आपण विरोध केला, त्यासाठी वर्गणी देण्याचा कांहीं देशांचा नकार कायमच राहणार, हें उघड आहे. जागतिक कोर्टाला आपल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचा अधिकारच नाहीं, पण आर्थिक प्रश्न फारच महत्त्वाचा आहे. कोर्टाचा निवाडा नास्तिपक्षीं झाला, तर युनायटेड नेशन्स जुन्या लीग ऑफ नेशन्ससारखा निष्प्रभ ठरून जाईल. "युनायटेड नेशन्सचे हात बळकट करूं पाहणारे देश, ज्या देशांनीं सनदीच्या तत्त्वांना फेटाळून युनायटेड नेशन्सला आर्थिक अडचणींत आणले, त्यांचे बाबतींत मूग गिळून का बसतात ? बेल्जमनें नव्या काँगो प्रजासत्ताकावर आक्रमण केलें नसतें, तर लुमुंबाची हत्या टळली असती, शोंबे केव्हांच हद्दपार झाला असता आणि काँगोमधील जनता स्वातंत्र्य दृढ करण्याचे कामीं गुंतली असती." असें रशियाचें म्हणणें आहे.

ज्या देशांची वर्गणी पूर्वीच्या दोन वर्षांच्या वर्गणीच्या रकमे-इतकी थकेल, त्या देशाला जनरल असेंब्लींत मताधिकार राहणार नाहीं, असें युनायटेड नेशन्सच्या चार्टरमध्यें म्हटलेलें आहे. एका वर्षाचे अवधींत, जादा वर्गणी न देणारे देश ह्या कलमाचे कक्षेत येतील. त्याप्रमाणें त्यांचा मताधिकार काढून घेण्याचा प्रयत्न करणें पाश्चात्त्य देशांना शक्य होईल काय ? आज युनायटेड नेशन्सच्या बजेटांतील तूट भरून काढण्याची मुख्य जबाबदारी अमेरिकाच पार पाडीत आहे; इतर कोणी वर्गण्या व कर्जे देवो वा न देवो.

---

### औरंगाबाद येथील महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद

२४ वी महाराष्ट्र राज्य सहकारी परिषद ही येत्या १ व २ सप्टेंबर १९६२ रोजीं औरंगाबाद येथें भरविण्याचें आतां निश्चित झालेलें आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनीं सदर परिषदेचें उद्घाटन करण्याच्या विनंतीचा स्वीकार केला आहे. परिषदेचें अध्यक्षस्थान श्री. वैकुंठभाई मेहता, अध्यक्ष खादी आणि ग्रामीण उद्योग मंडळ, हे भूषविणार आहेत.

---

### इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनच्या व्याजाचे दरांतील वाढ नव्या कर्जांना लागू

इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशननें १९ जुलै, १९६२ पासून दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा साडेसात टक्के याप्रमाणें ठरविला आहे. हें कर्ज आणि व्याज नियमितपणें परत देणाऱ्यांस व्याजावर पूर्वीप्रमाणेंच अर्धा टक्का सूट मिळेल. व्याजाचा हा नवीन दर १९ जुलै, १९६२ पूर्वी देण्यांत आलेल्या कर्जाला वा त्यांतील कोणत्याहि भागाला लागू होणार नाहीं.

---

### ब्रिटनमध्यें नोकरीसाठी जाणाऱ्यांत भारतीयांची संख्या जास्त

राष्ट्रकुल स्थलांतरितांविरुद्धचा कायदा जारी झाल्यावर नोकरीच्या दाखल्यासाठी करण्यांत आलेल्या २८१७ अर्जांपैकी ९५५ अर्ज भारतीयांनीं केले व त्यांपैकी ७८६ मंजूर करण्यांत आले. इतर देशांतून पुढीलप्रमाणें अर्ज करण्यांत आले. पाकिस्तान १७८ ( १६१ मंजूर ); सिलोन ८४ ( ८४ ); नायजेरिया ८०९ ( ७८१ ); कॅनडा २४४ ( २०६ ); ऑस्ट्रेलिया १९० ( १७३ ); जमेका ९८ ( ८७ ); न्यूझीलंड ५३ ( ५१ ); ऱ्होडेशिया व न्यासालंड ५० ( ४८ ); व त्रिनिदाद व टोबॅगो २२ ( १८ ).

---

### ब्रिटनमध्यें हिंदापेक्षा नायजेरियाचे व घानाचे विद्यार्थी अधिक आहेत.

ब्रिटनमध्यें पूर्ण वेळ शिक्षण घेणाऱ्या राष्ट्रकुल विद्यार्थ्यांची संख्या गेल्या वर्षी ३५,००० होती. त्यांपैकी भारतीय विद्यार्थ्यांची संख्या ३,४०० होती. भारताचेवर नायजेरिया ( ६,८०० ) व घाना ( ३,८०० ) यांचा क्रम लागतो.

---

### देणगी स्वीकारण्यासाठी २ लक्ष रु. ची तरतूद

मध्यप्रदेश सरकारच्या प्राणिसंग्रहासाठी रेवाच्या महाराजांनीं आठ 'पांढरे वाघ' देऊं केले आहेत. महाराजांनीं ते देणगी-दाखल देण्याचें मान्य केलें आहे; त्यांनीं ते इतकीं वर्षे बाळगले, त्याच्या खर्चाचा कांहीं भाग म्हणून त्यांना फक्त २ लक्ष रु. हवे आहेत ! मध्यप्रदेश सरकारनें ही देणगी स्वीकारण्यासाठी आपल्या १९६२–६३ च्या बजेटांत त्या रकमेची तरतूद केली आहे.


## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४ टक्के, २ वर्षें–४·२५ टक्के, ३ वर्षें–४·५० टक्के, ४ वर्षें–४·७५ टक्के, ५ वर्षे–५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा विस्तार

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५००,००० |
| ठेवी | रु. | तीन कोटी |
| खेळतें भांडवल | रु. | सव्वातीन कोटीहून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., *जनरल मॅनेजर.*

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. *चेअरमन.*

## इस्लाम विरुद्ध राष्ट्रवाद

अरब राष्ट्रवादाला विरोध करण्यासाठी इस्लामला राजकीय चळवळीचें स्वरूप देण्याचे प्रयत्न चालू आहेत. अडीच महिन्यां-पूर्वी मक्का येथें बैठका भरून, तेथून जागतिक इस्लाम परिषदेसाठी बगदाद येथें प्रतिनिधि गेले. इराकचे पंतप्रधान, जनरल कासम ह्यानें त्यांचें मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. महंमदाच्या वंशांतील राजघराण्याकडून राजसत्ता हिसकावून घेणारा जनरल कासम, तो हाच. मक्का येथील बैठकींत इस्लामी संघ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यांत आला. प्रेसिडेंट नासरच्या अरब राष्ट्रवादाला शह देण्यासाठी धर्माचा उपयोग करण्याचा हा प्रयत्न आहे. राष्ट्र-वादाच्या आवरणाखाली जे इस्लामला कमी लेखतात, ते अरबांचे कट्टे दुष्मन समजले पाहिजेत, असें त्या बैठकीनें जाहीर केलें. मुस्लिम देशांनीं सर्व प्रकारच्या बिगर-इस्लामी गोष्टी व पद्धति नष्ट कराव्या, इस्लामी कायद्याप्रमाणें त्यांनीं वागावें, नव्या पिढीला फक्त इस्लामी शिक्षण द्यावें, शाळा, वृत्तपत्रें व रेडिओ ह्यांत बिगर-इस्लामी सूर उमटूं नये, असा आग्रह धरण्यांत आला. अरब देशांना राष्ट्रवाद आणि इस्लामी देशांच्या ऐक्यापेक्षा स्वदेशप्रेम जास्त महत्त्वाचें वाटतें. शिक्षण, कायदे, चालीरीती, कपडे, इत्यादि सर्व बाबतींत आधुनिकता दिसून येतें. इस्लामी संघाच्या घटना समितींत शेख, उल्लेमा आणि मुफ्ती अशा धर्मवेड्या लोकांचाच भरणा आहे. हा संघ खाजगी व्यक्तींचा आहे; राजकीय पुढाऱ्यांनीं एकत्र येऊन इस्लामला पूर्ववैभव प्राप्त करून द्यावें, असें त्यांचें आवाहन आहे. राजे सौद ह्यानें प्रेसिडेंट नासरच्या विरुद्ध राजकीय शस्त्र ह्या दृष्टीनें ह्या संघाच्या स्थापनेस हातभार लावून द्रव्यसाहाय्य केलें आहे; कारण अरबांचा उत्कर्ष राजे आणि शेख ह्यांपासून मुक्त होण्यावर अवलंबून आहे, असें प्रेसिडेंट नासरनें जाहीर केलें आहे. प्रेसिडेंट नासर हा इस्लाम धर्माशीं निष्ठावंत नाहीं, असा प्रचार करण्यासाठी हा संघ प्रयत्न करील हें उघड आहे. पण, प्रेसिडेंट नासरची समाजवादाकडील प्रगति त्यामुळें आटोक्यांत येण्याचा संभव नाहीं.

---

## सहकारी कायद्यांत दुरुस्ती

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या कार्यकारी मंडळानें ठराव करून संघाचे प्रतिनिधि व सहकारी कायद्याचे तज्ज्ञ यांची एक समिति स्थापन करून सध्याच्या १९६० च्या महाराष्ट्र सहकारी कायद्यांत व नियमांत दुरुस्ती करण्याची योजना तयार करण्याचें काम तिच्याकडे सोंपविलें आहे. समितींत पुढील ९ सभासद राहणार आहेत. श्री. जी. आर. पाटील, श्री. एम्. एन्. काका, श्री. बाबूराव काळे, श्री. ए. एन्. सामंत, श्री. ए. एच. कुळकर्णी, श्री. डी. ए. चौधरी, श्री. के. एम्. गुप्ते, श्री. एम. डी. विद्वांस, आणि श्री. डी. डी. चितळे.

या कायद्यांत दुरुस्ती सुचविण्याबद्दल जनतेकडून ज्या सूचना येतील, त्यांचा विचार करण्यासाठी समितीची सभा मुंबईला सर विठलदास ठाकरसी स्मारक भवनांत संघाचे कार्यालयांत भरेल. येत्या सप्टेंबरमध्यें औरंगाबाद येथें राज्य सहकारी परिषद भरणार आहे. तिच्यांत या समितीच्या शिफारसीवर निर्णय घेण्यांत येईल.

---

## ब्रिटनमधील कामगार स्त्रिया

ब्रिटनमधील २ कोटी ४० लक्ष कामगारांत एक तृतीयांशपेक्षा जास्त स्त्रिया आहेत. अवजड धंदे सोडून इतर जवळजवळ प्रत्येक व्यवसायांत स्त्री काम करीत असल्याचें आढळून येईल.

---

## पोस्टल सेव्हिंग्ज बँकेच्या व्याजाच्या दरांत वाढ

एक ऑगस्ट १९६२ पासून सर्व ठिकाणच्या टपाल-कचेऱ्यां-तील सेव्हिंग्ज बँकखात्यांतील रकमेवरील व्याजाचा दर अर्ध्या टक्क्यानें वाढविण्यांत येईल. त्यामुळें आतां वैयक्तिक खात्यावरील १०,००० रुपयांपर्यंतच्या ठेवींवर ( जॉइन्ट अकाउंट असल्याच्या प्रकरणीं २०,००० रुपयांच्या ठेवींपर्यंत ) व्याजाचा दर आतां दरसाल दरशेंकडा ३ टक्के व त्यापेक्षा जास्त असलेल्या रकमेवर त्याचप्रमाणें सरकारी खात्यांवरील रकमेवर आतां सध्यांच्या अनुक्रमें अडीच व दोन टक्के दराऐवजीं अडीच टक्के व्याज मिळेल. इतर सेव्हिंग्ज बँक खात्यांतील रकमेवरहि सध्यांच्या व्याजाच्या दरापेक्षा या तारखेपासून अर्धा टक्का जास्त व्याज मिळेल.

---

## भारताची लोकसंख्या ४४.२ कोटी

सन १९६१ च्या शिरगणतीची फेरतपासणी केल्यानंतर त्या-वेळीं ३० लाखांहून अधिक व्यक्तींची गणति झाली नसल्याचें आढळून आलें आहे. या शिरगणतीचा १ मार्च, १९६१ रोजीं देण्यांत आलेला कच्चा आंकडा सुमारें ४३.६ कोटी होता. याचाच अर्थ दर हजार व्यक्तींमागें ७ व्यक्तींची मोजणी झाली नव्हती. हा आंकडा जमेस धरतां भारताची १ मार्च, १९६१ रोजीं असलेली लोकसंख्या ४३·९ कोटी भरते. त्यांत गोवें, दीव, दमण, दादरा, नगरहवेली व नॉर्थ ईस्ट फ्रॉंटिअर एजन्सी या विभागांची लोकसंख्या जमेस धरतां हा आंकडा सुमारें ४४.२ कोटीला पोहोंचतो.

---

## पूर्णा नदी-योजनेला कर्ज

मराठवाड्यांतील पूर्णा नदीवर दोन धरणें बांधून शेतीला पाणी-पुरवठा करण्यासाठी व वीज निर्माण करण्यासाठी योजना आंख-ण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठी आंतरराष्ट्रीय विकाससंघटने-तर्फे १·३ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळालें आहे. योजना पूर्ण झाल्या-वर १,५२,००० एकर जमिनीला हुकमी पाणीपुरवठा होईल आणि १५,००० किलोवॅट वीज निर्माण करतां येईल. दख्खनच्या पठारावरील मराठवाडा हा भाग निर्जल म्हणून प्रसिद्ध आहे. दुष्काळी म्हणून गांजलेला हा भाग पाणीपुरवठ्यामुळें समृद्ध होऊं लागेल.

---

## मध्यप्रदेश सरकारचें कॉंग्रेसकडील येणें

१९५७ मध्यें कॉंग्रेसचें अधिवेशन इंदूर येथें भरविण्यांत आलें होतें. त्या वेळीं मध्यप्रदेश सरकारनें अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीला मदत केली होती. मंडप घालणें, झोपड्या उभारणें, इत्यादि कामा-साठीं सामान पुरवण्यांत आलें होतें व यांत्रिक अवजारांचें साह्य देण्यांत आलें होतें. त्याबद्दल कॉंग्रेसकडून रु. ४८,०५३ येणें आहेत. परंतु १४ स्मरणपत्रें पाठवूनहि सदर रक्कम मध्यप्रदेश सरकारला अद्याप मिळालेली नाहीं.

---

## भारत-पूर्वजर्मनी सागरी वाहतूक

भारत व पूर्वजर्मनी ह्यांच्यामधील व्यापारासाठी उभयतां देशांत मालवाहू बोटींची नियमित ये-जा करतां येईल काय, ह्या प्रश्नाचा अभ्यास करण्यांत येत आहे. अशा प्रकारच्या वाहतुकीचा करार रशिआ व भारत ह्यांच्या दरम्यान आहे. सध्यां भारतामधील तीन कंपन्यांच्या मालवाहू बोटी जर्मन बंदरांत जातात व जर्मन बोटी भारतामधील बंदरांत येतात.

---

### ग्रामीण भागांत छोट्या उद्योगधंद्यांची स्थापना

भारताच्या औद्योगिक विकासांत समतोलपणा राखण्यासाठी ग्रामीण भागांत उद्योगधंदे काढण्याचें महत्त्व आतां सर्वमान्य झालेलें आहे. ग्रामीण भागांतील लोकांचें जीवनमान वाढविण्यासाठी अशा उद्योगधंद्यांची मदत होते. त्याचप्रमाणें खेड्यांतील लोकांचा शहरांकडे येणारा लोंढा कमी करण्याचें कार्यहि त्यामुळें कांहीं प्रमाणांत होतें. ग्रामीण विभागांत काढतां येण्यासारख्या छोट्या उद्योगधंद्यांचा विचार करण्यासाठी दिल्ली येथें एक परिषद भरविण्यांत आली होती. परिषदेंत ग्रामीण भागांचें औद्योगीकरण झपाट्यानें करण्याविषयीं विचार करण्यांत आला आणि औद्योगिक विकासाच्या ५० योजना सुरू करण्याचें ठरविण्यांत आलें. नियोजन समितीनें ग्रामीण भागांत छोट्या उद्योगधंद्यांचा प्रसार करण्यासाठी १५ कोटी रुपयांची योजना तयार केलेली आहे. ह्या योजनेच्या द्वारां प्रादेशिक औद्योगीकरण सुलभ होईल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. प्रथम ४० नव्या विकासाच्या कामांना प्रारंभ करण्याचें ठरलें होतें. परंतु परिषदेंत भाग घेतलेल्या राज्यांच्या उत्साहामुळें त्यांची संख्या वाढविण्यांत आली. आतां निरनिराळ्या राज्यांत मिळून ४२ कामें व मध्यवर्ती सरकारच्या अंमलाखालीं असलेल्या प्रदेशांतून ४ कामें काढण्यांत यावयाचीं आहेत. त्याशिवाय मोठ्या उद्योगधंद्यांच्या जवळपास त्यांना पूरक अशीं ४ कामें चालू करण्यांत येणार आहेत. ज्या भागांतून छोटे उद्योगधंदे उभारण्यांत यावयाचे आहेत त्या भागांची आर्थिक व तांत्रिक पाहणी येत्या आक्टोबरपर्यंत पुरी करण्यांत येणार आहे. मध्यवर्ती नियोजन समितीची ग्रामीण धंदेसमिति मार्गदर्शन करणार आहे. त्याशिवाय कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठी राज्याराज्यांतून सल्लागार समित्याहि स्थापन करण्यांत येणार आहेत.

### भारताचा पश्चिम युरोपशीं होणारा व्यापार

भारत व पश्चिम युरोप ह्यांच्या दरम्यान होणाऱ्या व्यापारासंबंधीं एक कौन्सिल स्थापन करण्याचा निर्णय भारत सरकारनें घेतला आहे. भारताच्या व्यापार व उद्योगखात्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारविभागातर्फे एक सभा घेण्यांत आली होती. ह्या सभेला निरनिराळ्या निर्यात-उत्तेजक मंडळांचे अध्यक्ष व निर्यात व्यापाऱ्यांचे प्रतिनिधि हजर होते. पश्चिम युरोपशीं भारताचा जो व्यापार होतो त्यांत उत्पन्न होणाऱ्या निरनिराळ्या प्रश्नांचा अभ्यास करणें, युरोपला करावयाच्या निर्यातीचीं लक्ष्यें ठरविणें, आणि तीं लक्ष्यें गांठण्यासाठी उपाय सुचविणें, अशीं कार्ये संकल्पित मंडळाकडे सोंपविण्यांत येणार आहेत. मंडळावर निर्यात उत्तेजक मंडळांचे प्रतिनिधि असतील, त्याप्रमाणें युरोपला माल निर्यात करणाऱ्या कॉमॉडिटी बोर्डांचे प्रतिनिधीहि असतील. पश्चिम युरोपला प्रत्यक्ष निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या साह्यानें निरनिराळ्या मालाच्या निर्यातीकडे लक्ष देण्यासाठी वेगवेगळ्या उपसमित्याहि स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्या उपसमित्या निरनिराळ्या प्रकारच्या मालाच्या निर्यातीचीं लक्ष्यें ठरवितील आणि तीं गांठण्यासाठी व्यावहारिक उपायहि सुचवितील. उपसमित्यांकडून सुचविण्यांत आलेल्या निर्यातीच्या लक्ष्यांत एकसूत्रता आणून सर्व पश्चिम युरोपसाठी निर्यातीची एक पद्धतशीर योजना आंखण्याचें काम कौन्सिल करील. युरोपिअन कॉमन मार्केटमध्यें सामील झालेल्या देशांना करण्यांत यावयाच्या निर्यातीच्या प्रश्नांचा अभ्यास प्रथम करण्यांत येईल. निर्यात व्यापारी आणि माल निर्माण करणारे कारखानदार ह्यांना निर्यात करण्याच्या कामीं काय करतां येईल आणि त्यांचे परस्पर संबंध कसे असावे ह्यासंबंधींहि सभेंत चर्चा करण्यांत आली.

### जपानच्या मदतींत वाढ होण्याची शक्यता

पश्चिम युरोपचा दौरा करून परत आल्यावर अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई व जपानचे भारतामधील वकील ह्यांची एक बैठक झाली. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या दुसऱ्या वर्षासाठीं जपानकडून अधिक मदत मिळविण्याबाबत त्यांच्यांत चर्चा झाली. भारताला मदत करणाऱ्या देशांच्या गेल्या बैठकींत जपाननें १९६२–६३ सालासाठी २ कोटी डॉलर्स देऊं केले होते. परंतु आतां जपान ३ कोटी डॉलर्स देण्यास तयार आहे. जपानप्रमाणेंच इतर देशहि भारताला यावयाच्या आपल्या मदतीचा वाटा वाढवितील असा अंदाज करण्यांत येत आहे. "भारत मित्रमंडळांत" इटली हा देश नव्यानें सामील झाल्याची बातमी आहे. मंडळांत आणखीहि कांहीं देश सामील होण्याची शक्यता आहे.

### कर्तबगार चालकांची उणीव

अमेरिकेंतील लॉंग आयर्लंड विद्यापीठांतील प्राध्यापक डॉ. सेठी ह्यांचें मुंबई येथें व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय "उत्पादन वाढविण्याच्या कामांत चालकांचें स्थान" असा होता. डॉ. सेठी आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारतांत नैसर्गिक साधनसामग्री भरपूर आहे. परंतु तिचा विकास करण्यासाठी जें कुशल चालकत्व लागतें त्याची उणीव आहे. उत्पादन वाढविण्याची मुख्य जबाबदारी चालकांवर व कारभार हांकणाऱ्या अधिकाऱ्यांवरच पडते. उत्पादनाची प्रक्रिया ही आर्थिक, सामाजिक अशा संमिश्र स्वरूपाची आहे. त्यामुळें एका देशांत फलद्रुप ठरलेल्या कार्यपद्धति दुसऱ्या देशांत उपयुक्त ठरतीलच असें सांगतां येणार नाहीं. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील अगर पश्चिम जर्मनीमधील पद्धति भारतांत जशीच्या तशी चालणार नाहीं.

### रशिआकडून अधिक मदत मिळण्याचा संभव

रशिआचे उपपंतप्रधान मि. मिकोयन दिल्लीला भेट देऊन गेले. त्यांनीं आपल्या मुक्कामांत भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापारखात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा यांच्याशीं वाटाघाटी केल्या. सध्यां रशिआ आणि भारत ह्यांच्यांत असलेल्या व्यापारी कराराऐवजीं दुसरा करार करण्यासंबंधींच्या वाटाघाटी सुरू करण्यांत येणार आहेत. उभयतां देशांमधील व्यापार वाढावा म्हणून नवीन कराराची आवश्यकता वाटत आहे. गेल्या वर्षीं भारतानें रशिआकडून २५ कोटी रुपये किंमतीचा माल आयात केला आणि ३१ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील रशिआच्या मदतीनें होणारीं कामें लवकर व्हावीं म्हणून दोन्हीं देश उपाय योजणार आहेत. रशिआ विजेच्या उत्पादनाची व तेलाच्या उत्पादनाची यंत्रसामग्री अधिक तत्परतेनें पुरविणार आहे. रशिआच्या मदतीनें भिलाई येथील पोलाद कारखान्याचा आणखी विस्तार करण्यांत येणार आहे.

### खार जमिनीची मशागत करणार

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कच्छ जिल्ह्यांतील ८०,००० एकर खार जमीन लागवडीखालीं आणण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी २० लाख रुपये खर्च येणार आहे. जमिनीचा खाऱ्या पाण्यापासून बचाव करण्यासाठी बंधारे घालणें आवश्यक आहे. सुमारें ३२,००० एकर जमिनींत असे बांध घालण्याचें काम सुरूहि झालें आहे. कच्छमधील खार जमिनीचें क्षेत्र ९ लाख एकर आहे.

**पंजाबमधील दारूबंदीसंबंधीं सार्वमत**—सर्व पंजाबमध्ये दारूबंदीचा कार्यक्रम अंमलांत आणण्याचा पंजाब सरकारचा विचार आहे. परंतु त्यापूर्वी कार्यक्रमासंबंधीं येत्या डिसेंबर महिन्यांत राज्यांतील लोकांचें सार्वमत घेण्यांत येणार आहे. सरकारतर्फे दारूबंदीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर करण्यांत येणार आहे. राज्यांत दारूबंदी अंमलांत आली तर सरकारचें ५ कोटी रुपयांचें उत्पन्न बुडेल.

**दामोदर नदी-खोरें योजना**—दामोदर नदी-खोरें योजनेचें १९६२-६३ चें अंदाजपत्रक पश्चिम बंगालच्या विधानसभेंत मांडण्यांत आलें. वीजनिर्मितींत वाढ करण्यासाठी अंदाजपत्रकांत १०·२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. १९६१-६२ मध्यें दामोदर नदी-खोरें योजनेनें विजेच्या विक्रीनें १० कोटी रुपये मिळविले. चालू वर्षी ११ कोटी रुपये मिळतील असा अंदाज आहे.

**गोव्यांत समाजविकास योजना**—पोर्तुगालच्या राजवटीपासून मुक्त झालेल्या गोवा, दमण व दीव ह्या भारतीय प्रदेशांत समाजविकास योजना चालू करण्यांत येणार आहेत. येत्या तीन महिन्यांत ह्या भागांत तीन विकास गट स्थापन करण्यांत येतील. पुढील वर्षाच्या एप्रिल महिन्यांत आणखी तीन गट स्थापन करण्यांत येतील. १९६३ च्या ऑक्टोबरपर्यंत विकासगटांची संख्या १० ते १२ होईल.

**बंगलोर येथील घड्याळांचा कारखाना**—हिंदुस्थान मशीन टूलसच्या बंगलोर येथील घड्याळांच्या कारखान्यांत येत्या आक्टोबरपासून उत्पादनास प्रारंभ होईल. कारखान्यांत जून १९६१ पासून घड्याळें जुळविण्याच्या कामास प्रारंभ झाला. तेव्हांपासून १४,४३९ घड्याळें जुळविण्यांत आलीं. त्यांपैकी १०,३७८ विकण्यांत आलीं. कारखान्याची इमारत पुरी होत आली असून ९१·५ लाख रुपयांची यंत्रसामग्रीहि आली आहे.

**'मिग' विमानांची खरेदी!**—ध्वनीहूनहि अधिक वेगानें उड्डाण करणारीं रशियाचीं 'मिग' २१ हीं विमानें कशीं काय आहेत तें पाहण्यासाठी भारताच्या वैमानिकांचें एक प्रतिनिधिमंडळ मॉस्कोला गेलें आहे. हीं विमानें भारताला पुरविण्याची व तीं भारतांतच बनविण्यासाठी मदत देण्याची तयारी रशिआनें दाखविली आहे. विमानांची चांचणी भारतीय वैमानिक करणार आहेत.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | " ३। " |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | " ५ " |

मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

वाढत्या धंद्याकरितां

मर्यादित

मुदतीच्या ठेवी

घेणें आहेत.

The Travancore Ogale Glass, Mfg. Co. Ltd.
P. O. Udyogamandal,
(KERALA.)

## हिंदी बँकिंगच्या प्रगतीची दिशा
## सेमिनारच्या विविध शिफारसी

हिंदी बँकर्सची एक प्रातिनिधिक बैठक इंडियन बँक्स असोसिएशनच्या विद्यमानें मुंबई येथें भरविण्यांत आली होती, तिचे मध्यें भारतांतील बँकिंगविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करण्यांत आली. अशा तऱ्हेची हिंदी बँकिंगच्या इतिहासांतील ही पहिलीच बैठक होय. तिला रिझर्व्ह बँकेचे, स्टेट बँकेचे आणि इतर आर्थिक संस्थांचे प्रतिनिधि निरीक्षक म्हणून उपस्थित होते. ह्या सेमिनारनें शंभराचेवर ठराव संमत केले आहेत, त्यांचा विचार आतां इंडियन बँक्स असोसिएशनची मॅनेजिंग कमिटी करील.


इतर पुढारलेल्या देशांतील बँका आपल्या गिऱ्हाइकांसाठी ज्या सेवा करतात, त्या भारतांतील बँकांनींहि हळूहळू सुरू कराव्या. उदाहरणार्थ, टेलर पद्धत, नाइट सेफ सर्व्हिस, पर्सनल मनिऑर्डरी, नाताळ-दिवाळी-पूजा क्लब्स, देणगीचे चेक, मालमत्ता सुधराई, दुरुस्तीसाठी कर्जें, इनकमटॅक्स रिटर्न्स भरणें, इत्यादि. सध्यां जेथें बँक कचेऱ्या नाहींत तेथें त्या उघडूनच ठेवींची वाढ द्रुतगतीनें होईल. बँकांचे आणि रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी ह्यांची त्यासाठी एक नियोजन समिति नेमण्यांत यावी; तिनें बँकांच्या शाखा-विस्ताराबाबत सल्ला द्यावा. सध्या १४०० गांवांतून एकहि बँक कचेरी नाहीं. त्यांचा नवी कचेरी उघडण्याच्या दृष्टीनें क्रम लावावा. मोबाईल बँकिंग सर्व्हिसबाबतहि या समितीनें सल्ला द्यावा. बिल मार्केटच्या निर्मितीच्या प्रश्नासाठी असोसिएशननें एक खास संघटना उभारावी; त्याची पूर्वतयारी म्हणून डिस्काउंट हाउस आणि ॲक्सेप्टिंग हाउस ह्यांची स्थापना केली जावी. मालाच्या निर्मितीपासून तो आगबोटीवर चढविण्यापर्यंतच्या क्रियांना ज्या बँका भांडवल पुरवतात, त्यांना त्यांतून निर्माण होणाऱ्या फॉरिन एक्सचेंजच्या व्यवहारांतहि हिस्सा मिळावा; स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन मार्फत अशी निर्गत झाली तरी सुद्धा मंदीच्या काळांतील जादा पैशाच्या विनियोगाचें साधन म्हणून १८० दिवसांच्या मुदतीच्या ट्रेझरी बिलांची आवश्यकता आहे. पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंतील ठेवींवरील व्याज इन्कमटॅक्स पात्र नाहीं; ती सवलत बँकांतील ठेवींवरील व्याजासहि मिळावी. व्यापारी बँकांनीं दीर्घकालीन औद्योगिक कर्जें अधिकाधिक प्रमाणांत द्यावीं. त्याला उत्तेजन म्हणून अशा कर्जांच्या व्यवहारांतील नफ्यावरील इन्कमटॅक्सवर १०% रिबेट दिला जावा. रीफायनॅन्स कॉर्पोरेशननें रीफायनॅन्सच्या अटी अधिक सैल कराव्या. सध्यां लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यासाठी रिझर्व्ह बँक चालवीत असलेली गॅरंटीची योजना मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांनाहि मिळावी. ज्या चहाच्या आणि कॉफीच्या मळ्यांना व्यापारी बँका कर्जपुरवठा करतात, त्यांचा सर्व फॉरीन एक्सचेंजचा व्यवहार त्या त्या व्यापारी बँकांकडे जावा. बँकेंतील खात्यांतील रकमांना, सेफ कस्टडींतील जिनसांना आणि लॉकर्सना नॉमिनेशनची सोय असावी. शाखांचें ऑडिट २२८ व्या कलमानें सक्तीचें केलें आहे, ती सक्ती नसावी. बँकिंग ही मध्यवर्ती सरकारच्या कक्षेंतील बाब असल्यानें आणि बँकांच्या नोकरवर्गाबाबत खास ट्रायब्यूनल्स व्यापक अवार्ड करीत असल्यानें बँकांना राज्यसरकारांचे कामगारविषयक विविध कायदे लागू केले जाऊं नयेत. बँकांच्यासाठी एक आचारसंहिता निर्माण केली जावी. बँकांनीं इतर बँकांतील वरिष्ठ अनुभवी नोकर आपल्याकडे घेतांना संयम राखावा; दुसऱ्याचे कर्जदार आपणांकडे ओढूं नयेत.

### आंध्रमधील हिऱ्याच्या जुन्या खाणी

आंध्र प्रदेशांतील अनंतपूर जिल्ह्यांत हिऱ्याच्या कांहीं जुन्या खाणी आहेत. ह्या खाणी पुन्हा चालू करतां येतील किंवा काय ह्याची पाहणी भारत सरकारचें भूस्तर खातें करणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत आंध्र प्रदेशांतील आणखीहि कांहीं जुन्या हिऱ्यांच्या खाणींची तपासणी करण्यांत येणार आहे. सध्यां मध्यप्रदेशांतील पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणीच काय त्या हिऱ्याचें उत्पादन करूं शकतात. पन्ना येथील खाणी चालविण्यासाठी एक तांत्रिक अहवाल तयार करण्यांत आला आहे. अहवालाप्रमाणें १९६३ मध्यें पन्ना येथील सर्व खाणी चालू व्हाव्यात असा अंदाज आहे. १९६१ सालीं १,३०९ कॅरेटस वजनाचे हिरे उत्पादन करण्यांत आले. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत ९०,००० कॅरेटस वजनाचे हिरे निर्माण करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे.

### छोट्या उद्योगधंद्यांची यंत्रसामग्री

छोट्या उद्योगधंद्यांना लागणारी यंत्रसामग्री आयात करण्यासाठी भारत सरकारनें, जपाननें दिलेल्या कर्जांतून ३० लाख रुपये मंजूर केले आहेत. ही यंत्रसामग्री व इतर साधनें संबंधित उद्योगधंद्यांना हप्त्यानें विकण्यांत यावयाची आहेत. हा आयात व्यवहार जपान स्मॉल प्लँट कमिटी आणि भारताचे नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन ह्यांनीं पुरा करावयाचा आहे. जपानची कमिटी जपानमधील कारखान्यांकडून मिळूं शकणाऱ्या यंत्रसामग्रीची माहिती व किंमती कॉर्पोरेशनला कळवील. आयातींत एकसूत्रता यावी म्हणून प्रयत्न करण्यांत येतील. यंत्रसामग्री आयात करण्यांत आल्यावर भारतामधील छोटे धंदेवाले पाहिजे ती सामग्री पसंत करतील.




हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.